सार्वभौम जनता 12.11.25

# चिमुकलीवर अत्याचार; नराधम गजाआड

सार्वभौम जनता 12/11/25

**मुखेड (प्रतिनिधी) :** शहरातील एका ६ वर्षाच्या चिमुकलीवर एका नराधम युवकाने अत्याचार केल्याची संतापजनक घटना मुखेड शहरात ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी उशिरा उघडकीस आली. या प्रकरणी मुखेड पोलीस ठाण्यात ८ नोव्हेंबर रोजी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या नराधमास गजाआड केले आहे.

या बाबतची माहिती अशी, मुखेड शहरातील खंडोबा गल्लीतील ६ वर्षाची चिमुकली खाजगी शिकवणीसाठी गेली होती. खाजगी शिकवणी संपल्यानंतर ती मुलगी घरी आली नसल्यामुळे पालकांनी चौकशी केली असता संबंधित खाजगी शिकवणी चालकांनी मुलगी घरी गेल्याचे सांगितले पण ती मुलगी घरी आली नसल्याचे संबंधित पालकांनी चिंता व्यक्त केली. यानंतर चौकशी केली असता ती मुलगी शिकवणी जवळ पुन्हा आली असल्याचे शिकवणी चालकाने पालकांना कळविले. पालक शिकवणीजवळ आल्यानंतर पाहिले असता संबंधित मुलगी घाबरलेल्या अवस्थेत व शरीराला जखमा व रक्त लागलेले आढळून आले. ६ वर्षाच्या मुलीला चौकशी झालेला विश्वासात घेऊन केली असता तिने प्रकार सांगितला यानंतर पालकांनी त्या पीडित मुलीस मुखेड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करून उपचार केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी चिमुकलीवर लैंगिक छळ झाल्याचे सांगितले. ही घटना मुखेड शहरातील नारलावार गल्ली घडली.

याप्रकरणी पीडित मुलीच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी ओमक सतीश डाकुरवार रा. मुखेड यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ६५ (२) व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४ अन्वये मुखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या नराधमास पोलिसांनी गजाआड केले आहे.